दिनांक ०९ मे २०२०

## सांस्कृतिक विभाग

# पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी

रामानंदनगर येथील आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयामध्ये शनिवार, दि. 09 मे, 2020 रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणातील कर्मवीरांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम व महाविद्यालय विकास समिती सदस्य महेंद्र (आप्पा) लाड उपस्थित होते.

महात्मा जोतिराव फुलेंच्या विचारातून प्रेरित होऊन कर्मवीर भाऊराव पाटीलांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. खेड्यापाड्यातील गरिब व मागास मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. शिक्षणक्षेत्रात ‘कमवा आणि शिका’ ही योजना त्यांनी रुजवली. भारत सरकार कडून त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 9 मे 1959 रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

**निष्पत्ती**

- कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याप्रती सद्भावना प्रकट झाली.
- कर्मवीरांच्या जीवनकार्याचा जागर झाला.

**लाभार्थी संख्या : २**



प्रमुख
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)